# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्ष 1989 मध्ये स्थापिलेले)

ज्ञानगंगा घरोघरी

## नियोजन मंडळ बैठक

# कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| बैठक क्रमांक | : | 40 |
| स्थळ | : | विद्यापीठ प्रशासकीय इमारत - सभागृह<br>यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ<br>नाशिक, 422222 |
| वार व दिनांक | : | मगळवार, दिनांक : 17 डिसेंबर 2019 |
| वेळ | : | सकाळी : 11.30 |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

---

## कार्यवृत्त

40 वी, नियोजन मंडळ बैठक, मंगळवार, दिनांक 17 डिसेंबर, 2019 रोजी सकाळी 11.30 वाजता, विद्यापीठ प्रशासकीय इमारत - सभागृह, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती. खालील सदस्य बैठकीस उपस्थित होते.

1. मा. प्रा. ई. वायुनंदन, कुलगुरू — अध्यक्ष
2. मा.डॉ.दिलीप म्हैसेकर,कुलगुरु — सदस्य
3. मा.प्रा.मनोज कुलश्रेष्ठ, प्र कुलगुरू — सदस्य
4. मा.डॉ. संजय चाकणे, इंदापूर — सदस्य
5. मा. डॉ.हेमंत राजगुरू — सदस्य
6. मा.डॉ. दिनेश भोंडे, कुलसचिव, — सदस्य सचिव,

खालील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

7. मा.डॉ. पी.व्ही.रामण्णा,मुंबई — सदस्य
8. मा.डॉ.महेंद्र कडू, नागपूर — सदस्य
9. मा.डॉ.प्रमोद बियाणी, संचालक — सदस्य

| विषय क्रमांक | | तपशील |
|---|---|---|
| 40.1.0 | | स्वागत<br>**मा.कुलसचिवांनी सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले.त्यानंतर विद्यापीठास प्राप्त झालेले पुरस्कारांची माहिती दिली.**<br>1) दि. 09 ते 12 सप्टेंबर, 2019 या कालावधीत एडिनबर्ग, स्कॉटलंड येथे Commonwealth of Learning, Canada यांनी आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले होते. या परिषदेमध्ये दि. 11 सप्टेंबर, 2019 रोजी Commonwealth of Learning, Canada यांच्याकडून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास सन 2019 मध्ये Excellence Award for Institute हा पुरस्कार व सन्मानचिन्ह प्राप्त झाले. या कार्यक्रमास विद्यापीठाच्या वतीने मा. कुलगुरू व मा. कुलसचिव उपस्थित होते.<br>2) **दि.** 3 डिसेंबर 2019 रोजी नवी दिल्ली येथे Ministry of Human Resource Development, Govt of India, New Delhi यांनी स्वच्छ परिसर (Non Residential Universities) हा पुरस्कार यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास प्राप्त झाला आहे.या कार्यक्रमास मा. कुलगुरू व मा. कुलसचिव उपस्थित होते. |
| 40..2.0 | 40..2.01 | दि. 29 डिसेंबर 2019 रोजी झालेल्या 39 व्या नियोजन मंडळाच्या बैठकीचे कार्यवृत्तास मंजुरी बैठकीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.<br><br>**नियोजन मंडळ ठराव:** दि. 29 डिसेंबर 2019 रोजी झालेल्या 39 व्या नियोजन मंडळाच्या बैठकीचे कार्यवृत्तास मंजुरी बैठकीचे कार्यवृत्तांत वाचून सर्वानुमते कायम |

| | | |
|---|---|---|
| | | करण्यात आला. |
| | 40..2.02 | दि. 29 डिसेंबर 2019 रोजी झालेल्या 39 व्या नियोजन मंडळाच्या बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल<br><br>**नियोजन मंडळ ठराव-** दि. 29 डिसेंबर 2019 रोजी झालेल्या 39 व्या नियोजन मंडळाच्या बैठकीत झालेल्या निर्णयावरील कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली |
| 40.3.0 | | **सखोल चर्चा करण्याचे विषय** |
| सर्व विद्याशाखा | 40.3.1<br>व<br>40.3.2 | सन 2019-2020, 2020-2021 यावर्षी राबविण्यात येणारे शिक्षणक्रम व<br>सन 2020-2021 यावर्षी नव्याने सुरु करावयाचे शिक्षणक्रम<br>यासंदर्भात विद्यापीठातील खालील विद्याशाखा संचालकांनी PPT द्वारे सादरीकरण केले.<br>1) विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा<br>2) वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा<br>3) संगणकशास्त्र विद्याशाखा<br>4) आरोग्य विज्ञान विद्याशाखा<br>5) मानव्यविद्या व सा.शास्त्रे विद्याशाखा<br>**1) विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा** - विद्याशाखा संचालकांनी नव्याने सुरु करावयाच्या खालील शिक्षणक्रमांची माहिती दिली.<br>B.Sc. (Botany, Zoology,Chemistry)<br>M.Sc.(Physics,Chemistry,Botany, Zoology)<br>M.Sc.(Mathematics)<br>**2) वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा** – विद्याशाखा संचालकांच्यावतीने सहयोगी प्राध्यापक यांनी BBA (General) या नव्याने सुरु करावयाच्या शिक्षणक्रमांबाबत माहिती सांगितली.<br>**3) संगणकशास्त्र विद्याशाखा** – विद्याशाखा संचालकांनी B.Sc.(Industrial Sciecnce) या शिक्षणक्रमाचे नाव बदलून B.Sc. असे करण्यात यावे, Specialisation Industrial Science या विषयात देण्यात यावे.<br>B.B.A. (Business Process Management) या शिक्षणक्रमाचे नाव बदलून B.B.A. असे करण्यात यावे, Specialisation Business Process Management या विषयात देण्यात यावे.<br>**4) आरोग्य विज्ञान विद्याशाखा** - विद्याशाखा संचालकांनी B.A./M.A.(Yoga) या नव्याने सुरु करावयाच्या शिक्षणक्रमांबाबत माहिती सांगितली.<br>**5) मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा** - विद्याशाखा संचालकांनी M.A.(Marathi), M.A.(Hindi) M.A.(Public Administration) , M.A.(Political Science) , M.A.(Sociology), M.A.(Economics), MSW या नव्याने सुरु करावयाच्या शिक्षणक्रमांबाबत माहिती सांगितली.<br><br>**नियोजन मंडळ ठराव:** विद्याशाखा संचालकांनी केलेल्या सादरीकरणानुसार विद्याशाखानुसार नव्याने सुरु करावयाच्या शिक्षणक्रमाचा प्रस्ताव UGC, नवी दिल्ली यांचेकडे पाठविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| विद्यार्थी सेवा विभाग | 40.3.3 | **सद्यस्थितीतील अभ्यासकेंद्र, नव्याने द्यावयाचे अभ्यासकेंद्र यासंबंधीचे धोरण**<br>यासंदर्भात प्र.संचालक, विद्यार्थी सेवा विभाग यांनी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ या वर्षात नवीन अभ्यासकेंद्र देण्याची कार्यपध्दती विषद केली.<br>1) सन 2020-21 या शैक्षणिक वर्षात संस्था/महाविद्यालये यांना विद्यापीठामार्फत नवीन अभ्यासकेंद्र देण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातील अग्रगण्य |

| | | |
|---|---|---|
| | | वृत्तपत्रातून जानेवारी 2020 मध्ये निवेदन प्रसिध्द करण्यात येईल.<br>2) संस्था/महाविद्यालयांकडून फेब्रुवारी 2020 मध्ये (एक महिना कालावधीत) प्रस्ताव मागविण्यात येतील.<br>3) आलेल्या प्रस्तावाची विभागीय केंद्रनिहाय पहाणी मार्च / एप्रिल या दोन महिन्यात करण्यात येईल.<br>4) पहाणी समितीच्या अहवालानुसार मान्यतेबाबतची कार्यवाही मे मध्ये करण्यात येईल.<br>5) मान्यता दिलेल्या संस्था/महाविद्यालयास जूनपासून अभ्यासकेंद्र सुरु करण्यात येईल.<br><br>**नियोजन मंडळ ठराव:** वरीलप्रमाणे मुद्दा क्र.1 ते 5 नुसार नवीन अभ्यासकेंद्र देण्याची कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| अंतर्गत गुणवत्ता आश्वासन कक्ष | 40.3.4 | **नॅक मूल्यांकन प्रक्रिया**<br>विद्यापीठाने नॅक मूल्यांकन प्रक्रियेसाठी अंतर्गत गुणवत्ता आश्वासन कक्ष स्थापन केला आहे. त्या कक्षाच्या माध्यमातून 2020-2021 या वर्षात विद्यापीठाचे मूल्यांकन करण्याची प्रक्रिया पार पाडण्यात येणार आहे असे मा. कुलगुरू यांनी विशद केले.<br><br>**नियोजन मंडळ ठराव: नॅक मूल्यांकन प्रक्रियेसाठी मा.कुलगुरु यांनी केलेल्या कार्यवाहीची नोद घेण्यात आली.** |
| 40.4.0 | | **सखोल चर्चेचे विषय** |
| विद्यार्थी सेवा विभाग | 40.4.1 | विद्यापीठाच्या विविध विद्याशाखांमार्फत राबविण्यात येणारे विविध सर्वसाधारण, व्यावसायिक व तांत्रिक शिक्षणक्रमांच्या प्रवेशशुल्कातील विद्यापीठ हिस्सा व अभ्यासकेंद्र हिस्सा,प्रवेश शुल्क यामध्ये सुसुत्रता आणण्यासाठी इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ,नवी दिल्ली यांनी तयार केलेले नियम मागविण्यात येऊन त्याआधारे या विद्यापीठाचे नियम तयार करावेत,यासाठी पुढील सदस्यांची समिती स्थापन करण्यात यावी असे ठरले –<br>01) डॉ.मनोज कुलश्रेष्ठ, सदस्य नियोजन मंडळ<br>02)डॉ. दिनेश भोंडे, कुलसचिव सदस्य सचिव, नियोजन मंडळ<br>03) डॉ.हेमंत राजगुरू, सदस्य नियोजन मंडळ<br>04) वित्त अधिकारी<br>त्यानुसार पुढील नियोजन मंडळ बैठकीत अहवाल सादर करावा यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

मा.कुलगुरू तथा अध्यक्ष यांच्या परवानगीने बैठक संपल्याचे मा.कुलसचिव यांनी जाहीर केले.

**सचिव**
**नियोजन मंडळ**

**अध्यक्ष**
**नियोजन मंडळ**